गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ७५ वा ● सोमवार ३१ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| 77Volume 1| Issue 75 | Date : 31/07/2023 | blow :Manday | Page 4 | Price 4

## पायाभूत सुविधाच नव्हे तर इतरही क्षेत्रात क्षमता बांधणीसाठी जागतिक बँकेने सहकार्य करावे : मुख्यमंत्री

### महाराष्ट्राच्या सादरीकरणाने जागतिक बँकेचे शिष्टमंडळ प्रभावित




मुंबई : जागतिक बँकेच्या सहकार्याने यापूर्वीही राज्यात अनेक मोठे प्रकल्प उभारले गेले असून भविष्यातही अनेक प्रकल्प उभारले जातील, पण केवळ पायाभूत सुविधांसाठी नव्हे तर इतरही क्षेत्रांत संस्थात्मक क्षमता बांधणीसाठी जागतिक बँकेने सहकार्य करावे असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालकांसमवेत हॉटेल ट्रायडंट येथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या बैठकीस मुख्य सचिव मनोज सौनिक, मित्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी तसेच विविध विभागांचे सचिव तसेच जागतिक बँकेतर्फे भारतातील कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर तसेच युके, अर्जेंटिना, ब्राझील, टांझानिया, इंडोनेशिया, चीन, सौदी अरेबिया, मेक्सिको, पोलंड, नायजेरीया आदी देशांचे कार्यकारी संचालक देखील उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, जागतिक बँक ही केवळ निधी देणारी संस्था नाही तर त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे विकसनशील देशांसाठी ज्ञानाचा मोठा स्रोत आहे. जागतिक बँकेसोबत राज्याची भागीदारी महाराष्ट्रातील लोकांचे जीवनमान अधिक सुधारण्यासाठी उपयोगी पडेल. देशात महाराष्ट्रामध्ये सर्वात चांगले कुशल मनुष्यबळ, उत्कृष्ट पायाभूत सुविधा असून आपले राज्य हरित तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य सेवा आणि बंदर पायाभूत सुविधा या क्षेत्रात भरीव प्रयत्न करत आहे असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी कृषी सुधारणा, महिला सक्षमीकरण, आरोग्य आणि सर्वांसाठी घरे यासाठी उचललेल्या काही महत्त्वाच्या पावलांची माहिती दिली.महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषद स्थापन करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे स्वप्न साकार करण्यासाठी आम्ही या परिषदेची स्थापना केली असून परिषदेने केलेल्या शिफारशींचा अभ्यास फास्ट ट्रॅक कमिटीमार्फत करण्यात येईल तसेच कालबद्ध अंमलबजावणीसाठी पावले उचलली जातील.आमचे सरकार शाश्वत विकासावर भर देत आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, हे लोकाभिमुख, सरकार असून गरीब आणि दुर्बलांना सक्षम करणे या जागतिक बँकेच्या उद्दिष्टांना अनुरूप अशी आमची धोरणे आणि कार्यक्रम आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाखाली आम्ही सगळे काम करत असून पंतप्रधानांनी जगात सर्व देशांशी परस्पर विश्वास आणि आदर यावर आधारित दृढ संबंध राहतील यासाठी प्रयत्न केले आहेत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करणार – उपमुख्यमंत्री**

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेषत: नदी जोड प्रकल्पाविषयी माहिती देऊन महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्राला मिळणारे पाणी गोदावरी खोऱ्याकडे । **पान २ वर**

## पुणे येथे पीएम् मोदी उद्या स्वीकारणार टिळक पुरस्कार

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी, १ ऑगस्ट २०२३ रोजी पुणे दौऱ्यावर येत आहेत. लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्काराने पंतप्रधानांना सन्मानित करण्यात येणार आहे. शरद पवार या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल. पुणे दौऱ्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी पुणे मेट्रोच्या नव्या टप्प्यासह विविध योजनांचे उद्घाटन करणार आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी सकाळी ११ वाजता दगडूशेठ गणपती मंदिरात जाऊन दर्शन घेऊन पूजाअर्चा करणार आहेत. सकाळी ११.४५ वाजता पंतप्रधानांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येईल. त्यानंतर, दुपारी १२:४५ वाजता पंतप्रधान मेट्रो रेल्वेला हिरवा झेंडा दाखवणार आहेत तसेच विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत.

पंतप्रधानांना लोकमान्य टिळक पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. लोकमान्य टिळकांच्या परंपरेचा सन्मान म्हणून दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचा आरंभ टिळक स्मारक संस्थेने १९८३ मध्ये केला. देशाची प्रगती आणि विकास यासाठी कार्य केलेल्या तसेच त्या बाबतीत उल्लेखनीय आणि विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी म्हणजे १ ऑगस्टला दरवर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो. पंतप्रधान या पुरस्काराचे ४१ वे मानकरी असतील. हा पुरस्कार मिळालेल्या दिग्गजांमध्ये डॉक्टर शंकर दयाळ शर्मा, प्रणव मुखर्जी, अटल बिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी, मनमोहन सिंह, एन आर नारायण मूर्ती, डॉ. ई. श्रीधरन या व्यक्तींचा समावेश आहे.

## राज्यात चार महिन्यांत ८ लाख ७५ हजार दस्तनोंदणी

मुंबई : राज्यात गेल्या चार महिन्यांत (एप्रिल ते जुलै ) ८ लाख ७५ हजार दस्तांची नोंद झाली. त्यामधून सुमारे १३१ कोटी २५ लाख रूपयांचा महसूल जमा झाला आहे. मागील वर्षी याच काळात ८ लाख ८० हजार दस्तनोंदणी झाली होती. त्यामधून १६० कोटी महसूल मिळाला होता. राज्य शासनाच्या महसूल विभागाने एक आणि दोन गुठ्यांचे व्यवहार बंद केल्यानंतर (जर एनए असतील तरच व्यवहार होतो) काही प्रमाणात दस्तनोंदणीचे प्रमाण कमी झाले आहे. सध्या सदनिका किंवा एन.ए. असलेले प्लॉटिंगची दस्तनोंदणी होत आहे. राज्यात जीएसटीनंतर सर्वाधिक महसूल मिळवून देणारा विभाग म्हणजे दस्तनोंदणी विभाग आहे. मागील वर्षी ५२ हजार कोटींचे उद्दिष्टे देण्यात आले होते. त्यापैकी २० हजार कोटींहून अधिक महसूल राज्यातून जमा झाला होता. त्यानंतर एप्रिल पासून नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले. त्यास आता चार महिने पूर्ण झाले आहेत. त्यानुसार जुलै महिन्याच्या अखेरीस राजयत ८ लाख ७५ हजार दस्तनोंदणी झाली. तर त्यामधून १३१ कोटी २५ लाख कोटींची महसूल जमा झाला आहे. मागील वर्षीच्या तुलनेत पाच लाखांनी दस्तनोंदणी कमी झाली आहे. तर महसुलात देखील ३० कोटींनी महसूल कमी झाला आहे.

## शेतमालाला हमीभाव मिळण्यासाठी लवकरच राज्य कृषी मूल्य आयोगाचे गठण : कृषिमंत्री धनंजय मुंडे

मुंबई : राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत आज मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहावर पार पडलेल्या बैठकीनंतर संयुक्त किसान मोर्चा (अराजकीय) यांनी सोमवारी पुकारलेले आंदोलन मागे घेतले आहे. या बैठकीत शेतीमालाला हमीभाव देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली असून त्यासाठी लवकरच राज्य कृषी मूल्य आयोगाचे गठण करून त्यामार्फत केंद्र सरकारकडे स्वतंत्र प्रस्ताव पाठवण्यात येईल, अशी माहिती मंत्री श्री. मुंडे यांनी दिली.या बैठकीमध्ये संयुक्त किसान मोर्चा



अराजकीय बळीराजा शेतकरी संघटना तसेच ऊसतोड कामगार व वाहतूकदार संघटनेच्या वतीने मांडण्यात आलेल्या विविध मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाल्यानंतर सोमवारपासून पुकारण्यात आलेले आंदोलन मागे घेतल्याचे संयुक्त किसान । **पान २ वर**

## देशात तीन वर्षांत १३ लाखांहून अधिक मुली, महिला बेपत्ता; सर्वाधिक घटना मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, महाराष्ट्रात

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : २०१९ ते २०२१ या तीन वर्षांत देशात १३.१३ लाखांहून अधिक मुली व महिला बेपत्ता झाल्या असून, त्यांच्यापैकी सर्वात जास्त मध्य प्रदेशातील असून, त्याखालोखाल पश्चिम बंगाल व




महाराष्ट्राचा क्रमांक आहे. अठरा वर्षांहून अधिक वयाच्या १०,६१,६४८ महिला आणि त्याहून कमी वयाच्या २,५१,४३० मुली २०१९ ते २०२१ या काळात देशभरात बेपत्ता झाल्या, असे केंद्रीय गृहमंत्रालयाने गेल्या आठवड्यात संसदेत सादर केलेल्या आकडेवारीत म्हटले आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने (एनसीआरबी) ही आकडेवारी जमा केली आहे. मध्य प्रदेशातून १,६०,१८० महिला आणि ३८,२३४ मुली वरील कालावधीत बेपत्ता झाल्या. पश्चिम बंगालमध्ये हीच संख्या १,५६,९०५ महिला आणि ३६,६०६ मुली अशी आहे. याच कालावधीत महाराष्ट्रातून १,७८,४०० महिला आणि १३,०३३ मुली बेपत्ता झाल्या. ओडिशात ७०,२२२ महिला व १६,६४९। **पान २ वर**

## पाकिस्तानात राजकीय पक्षाच्या मेळाव्यात बॉम्बस्फोट; प्रमुख नेत्यासह ३९ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली : पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात एका राजकीय पक्षाच्या मेळाव्यात आत्मघाती बॉम्बरने स्फोट घडवून आणल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या स्फोटात २० लोकांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. आता हा आकडा वाढला असून यामध्ये ३९ लोकांचा मृत्यू झाला आहे, तर २०० हून अधिक लोक जखमी झाल्याचं वृत्त पाकिस्तानी वृत्तपत्र 'द डॉन'ने दिलं आहे.

बाजौर जिल्ह्यातील खार येथे रविवारी जमियत उलेमा इस्लाम-फजल JUIAFया राजकीय पक्षाचा मेळावा सुरू होता. दरम्यान, दुपारी चारच्या सुमारास हा स्फोट झाला. या घटनेनंतर पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. अद्याप कोणत्याही संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. जखमींपैकी बहुतांश जणांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे मृतांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खारमधील स्फोटात JUIAF चे प्रमुख नेते मौलाना झियाउल्लाह जान यांचाही मृत्यू झाला. बाजौर जिल्हा आपत्कालीन अधिकारी साद खान यांनी याबाबतची पुष्टी केली. जखमींना पेशावर आणि टीमरगेरा येथील रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात येत आहे, अशी माहितीही साद खान यांनी 'द डॉन'ला दिली. स्फोटाचा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. JUIAFचे प्रमुख मौलाना फजलूर रहमान यांनी पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि खैबर पख्तूनख्वा प्रांताचे काळजीवाहू मुख्यमंत्री आझम खान यांच्याकडे या घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच कार्यकर्त्यांनी रुग्णालयात जाऊन रक्तदान करावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

## संभाजी भिडेंविरोधात गुन्हा दाखल



अमरावती : शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेचे संस्थापक व प्रमुख संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी यांच्यासंदर्भात वादग्रस्त विधान केले आहे. यावरून आता वाद निर्माण झाला आहे. या विधानाचे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवशेनात पडसाद उमटले. यावरून काँग्रेस चांगलीच आक्रमक झाली आहे. संभाजी भिडे यांनी अटक करण्याची मागणी केली जात आहे. याप्रकरणी संभाजी भिडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भिडे यांच्याविरोधात राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी काँग्रेसकडून आंदोलन केले जात आहे.

## अक्कलकोट शहरात डुकरांच्या सुळसुळाटामुळे घाणीचे साम्राज्य

### स्वामी भक्तांबरोबरच शहरवासियांतून तीव्र नाराजी

अक्कलकोट/प्रतिनिधी: शहरात डुकरांच्या सुळसुळाटामुळे घाणीचे साम्राज्य निर्माण होत आहे. मंदिर परिसरात अतिवावर होत असल्याने स्वामी भक्तांबरोबरच शहरवासियांतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शहरातील सर्व भागात झालेल्या पावसामुळे चिकलमय परिस्थिती निर्माण झालेले असताना यामध्ये डुकरांच्या धुमाकामुळे मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण होत आहे.श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान, अन्नछत्र मंडळ, समाधी मठ, गुरु मंदिर, जुना अडत बाजार, बसस्थानक परिसर, कांदा बाजार, मार्केट



यार्ड, शहरातील विविध गल्ली व चाळीतून असंख्य डुकरे मोकाटपणे फिरत आहेत. याबाबत नगरपरिषदेकडून मोकाट डुकरे सोडणार्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

## उजनी धरण दोन दिवसात होणार प्लस ! बळीराजा सुखावला!

पंढरपूर/प्रतिनिधी: तीन जिल्ह्यासाठी वर्धा येणे असलेली उजनी धरण दोन दिवसात प्लस मध्ये येणार असल्याची संकेत मिळत असून पावसाळा अद्याप शिल्लक असल्याने यावर्षी उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची आशा निर्माण झाली आहे यावर्षी पावसाने भरती सोड दिली आणि उजनी धरण रिकामी झालेली होते त्यामुळे चिंतेचा विषय बनला होता परंतु भीमा खोऱ्यात चांगला पाऊस सुरू झाल्याने उजनी सह अन्य धरणाची पातळी देखील झपाट्याने वाढू लागली आहे गेल्या काही दिवसापासून सतत उजनी धरणात निसर्ग येत आहे खडकवासला धरण पूर्ण क्षमतेने भरले असून उजनी धरणात विसर्ग सुरू आहे उजनी धरण दोन दिवसात प्लस मध्ये येणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे येत्या मंगळवारी उजनी धरण प्लस मध्ये होईल असा विश्वास लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अधिकारी सांगत आहेत त्यामुळे आता बळीराजा अशा पुन्हा पल्लवी झाले आहेत खडकवासला धरण पूर्ण भरले असल्यामुळे या धरणात येणारे पाणी सोडले जात आहे आणि ते पाणी उजनी धरणात सोडण्यात येत आहे

ऐन पावसाळ्यात उजनी धरण तहानलेले होते आणि पाणीटंचाईसाठी मोठी भीती निर्माण झाली होती सोलापूर शहराच्या पिण्याचे पाण्याची मोठी समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत होती पण आता भीती दूर होत आहे उजनी धरणात ६० टीएमसी पाणी असून अजून पावसाळ्याचे दिवस



शिल्लक आहे त्यामुळे यावर्षी देखील ओझोन धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता दिसू लागली आहे उजनी धरणात येणारा विसर्ग असाच राहिला तर ही शक्यता सत्यात उतरण्यास वेळ लागणार नाही अर्धा पावसाळा झाल्यानंतर का होईना उजनी भरण्याची तहान भागवताना दिसत असल्याचे तीन जिल्ह्यातील बळीराजा निश्चित सुखावला आहे

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



**✻ सुविचार ✻**

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### धर्माला लाभच संभवतो...

संरक्षण मंत्रालयाने राफेल लढाऊ विमान खरेदीआधी केलेल्या पूजेनंतर झाला होता. या विमानांना लिंबू लावले गेल्याने सरकार अंधश्रध्देला खतपाणी घालत असल्याचा आरोप झाला होता, तर राज्यात अलीकडेच राष्ट्रवादीचे अजित पवार सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर त्यांनी मंत्रालयातील ६०२ क्रमाकांचे दालन नाकारल्याच्या बातम्या आल्या होत्या. विज्ञानवादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून राज्याला प्रगतिपथावर नेण्याची अपेक्षा संविधानाला राज्यकर्त्यांकडून असताना महाराष्ट्रात अशा 'दालनाच्या' चर्चेची बातमी होणे आश्चर्यकारक आहे. ६०२ क्रमांकाचे दालन नाकारण्यामागे जर वास्तविक इतर कारणे असतील हा इच्छेचा भाग समजून घेता येईल. मात्र, केवळ अंधश्रध्देतून हा प्रकार होत असेल तर नेत्यांनीच अंधश्रध्देला खतपाणी घातल्यासारखे होईल. वर्ष २०१४ मध्ये तत्कालीन भाजप नेते एकनाथ खडसे यांनी याच दालनातून कृषी आणि महसूल विभागाचा कार्यभार सांभाळला होता. ते एकनाथ खडसे आज राष्ट्रवादीमध्ये गेले आहेत. जमीन गैरव्यवहाराच्या आरोपामुळे खडसे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. हे ६०२ क्रमांकाचे केबिन ज्येष्ठ आणि अनुभवी मंत्र्यांना दिले जाते. कृषिमंत्री पांडुरंग फुंडकर यांना २०१८ मध्ये हे दालन दिले गेले होते. त्यांचे निधन झाले. त्यामुळे हे दालन पवारांनी नाकारल्याची चर्चा आहे. विज्ञानाचा पाया पक्का असतो. तद्वतच धर्माचाही पाया मजबूत असतो. दोन्हीकडे सत्याचा शोध हेच सार असते, परंतु विज्ञानात त्यासाठी कसोट्या उपलब्ध असतात. जे धर्म चिकित्सेला नकार देतात, त्यांचे काळाच्या ओघात डबके बनून जाते. यातून केवळ कर्मकांड आणि निर्जीव उपासना पध्दतींशिवाय मागे काहीच उरत नाही. असा धर्म केवळ कर्मकांडाचे अवडंबर पोसतो. दुसरीकडे अशा धर्माचा वापर राजकीय सत्ता मिळवण्यासाठी सहज केला जातो. भारतासारख्या देशाचा इतिहास पाहिल्यास याची अनेक उदाहरणे सापडतील. ज्ञानेश्वरांनी विश्वाच्या देवतेकडे, विश्वरूपी ईश्वराकडे मागितलेले पसायदान म्हणून विज्ञानवादी ठरते, तर कर्मकांड हे आपसूकच अंधश्रध्देच्या रांगेत जाऊन बसते. 'चमत्काराला नमस्कार' करण्यामागे भीती किंवा इच्छा, आसक्ती असल्याने मूळ धर्माचे स्वरूप विकृत होते. त्यामुळे चिकित्सेच्या मार्गाने डोळसपणे श्रध्देचा स्वीकार व्हावा. यातून मूळ सत्यावर आधारित असलेल्या धर्माला लाभच संभवतो.

## वाचाळविरांचा सरदार कोण..?

पुरोगामी महाराष्ट्रात तर्कहीन, द्वेषाने भरबटलेले, आणि विषमतेची घाण डोक्यात असणाऱ्या, वाचाळविरांची संख्या कमी नाही. मेंदुचा वापर समाजात शांतता व सुव्यवस्था बिघडवण्यासाठी जास्त प्रमाणात करून धर्माला व सत्तेला ढाल बनवले जाते हि गोष्ट सामाजिक न्याय, समता व देशाच्या विकासाला घातक आहे. ज्या लोकांना माणसासोबत कसे रहावे, ज्यांच्या नावात, शिक्षणात काळाबाजार आहे. अशा लोकांना विद्वान, आदर्श मानुन शासकीय व जनतेची जबाबदारी असलेले लोक त्यांच्या समोर झुकतात तेव्हा झुकणाऱ्याच्या बुद्धीची किव तर येतेच लोकशाही, नितीमत्ता व विद्वता धोक्यात आहे याची खंत वाटते. आपण महालराष्ट्राचा जरी विचार केला तरीही आपल्याला प्रत्येक ठिकाणी सत्तेच्या आर्शिवादाने विषमता, व अन्याय दिसून येतो. यात नवीन असे काही नाही संपूर्ण महाराष्ट्राला याची जाणीव आहे. धर्माचा आधार घेऊन इतरां बद्दल चुकिचे व वादग्रस्त विधाने करून जनतेचे लक्ष मुळ समस्येवरून बाजूला सारून धर्माच्या व धर्माला पोषक असणाऱ्या वाचाळविरांना येथे संरक्षण दिले जाते. आपण अनेक घटना बघितल्या तर आपल्या लक्षात येते कि येथे विषमता व द्वेष कशा पद्धतीने मजबूत करून विकृत लोकांना मोठे केले जात आहे. एखादी घटना, गुन्हा घडल्यानंतर त्या घटनेतील गुन्हेगाराची जात शोधली जाते. आणि जर आरोपी मुस्लिम असेल तर लहान गोष्टही भावनिक तिव्रतेने मोठी केली जाते. ठिकाणी आंदोलन, मोर्चे, मुस्लिम विरोधी विधाने केले जातात. आणि यामध्ये महाराष्ट्राचे गृहमंत्री सुद्धां मागे राहत नाही. चुकीच्या व देशाच्या हितविरोधी बाबींसाठी सर्वांनी आक्रमक पणे उभे राहुन देशाचे हित, जनकल्याण व शांतता सुव्यवस्था बघने प्रत्येकांचे कर्तव्य आहे. परंतु मुस्लिम आरोपी असेल तर प्रत्येक बाबींची तिव्रता जास्त असते. आरोपी ला तात्काळ अटक केली जाते. परंतु जेव्हा आरोपी हा मुस्लिम नसुन तो हिंदुत्ववादी संघटनेशी, सत्तेशी संबधीत असतो तेव्हा मात्र गुन्हा कितीही गंभीर असला तरीही त्याला तात्काळ अटक होत नाही, आंदोलन, मोर्चे निघत नाहीत, उलटपक्षी आम्ही घटनेची शहानिशा करून योग्य ती कार्यवाही करू असे बोलून गृहमंत्री गंभीर बाबही अगदी किरकोळ करून गंभीर बाबींच्या आरोपींना पाठीशी घातले जाते. आणि जेव्हा सर्व सामान्य जनता वेगवेगळ्या माध्यमातून व्यक्त व्हायला लागतात तेव्हा गृहमंत्री साहेबांच खाते सोशल मिडीयावर कोणत्याही व्यक्ती, धर्म जात किंवा द्वेष पसरवणाऱ्या बाबी शेअर करू नये आणि तसे केल्यास त्यांच्या वर गुन्हे दाखल करण्यात येतील असे पत्र, आदेश काढतात आणि सोशल मिडीयावर मत व्यक्त केल्याने अनेक तरुणांवर गुन्हे दाखल झाल्याचेही उदाहरणे आहेत. मग मुळ मुद्दा हा येतो. मुस्लिम आरोपींना कोणतीही शहानिशा न करता तात्काळ अटक व हिंदुत्ववादी संघटनेशी संबधित लोकांना सरकार च क्लिन चिट देत असेल तर हा जातीवाद, धर्म वाद, विषमता पसरवणारे कृत्य नाही का? हिंदुत्ववादी संघटनेशी संबधीत विकृत माणसिकतेचे अनेक मनोरुग्ण आज समाजामध्ये फिरून चुकिचा इतिहास सांगत आहेत, राष्ट्र व राष्ट्रीय प्रतिकांचा अवमान करत आहेत. स्वातंत्र्य सेनानी व महापुरुषांबद्दल चुकिचे विधाने करणारे मनोरुग्ण बाहेर फिरुन सामाजिक वातावरण दुषीत करत असताना, त्यांना थांबवने, त्यांच्या वर बंधने घालुन शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे हे सरकारचे काम आहे. मनोरुग्ण व विकृत व्यक्तीला बाहेर फिरू देऊ नका, विकृती पसरवून समाजातील तरुणांची दिशाभूल करणाऱ्यांना आवरण्याची विनंती लोक सरकार ला करतात तरीही सरकार विकृत लोकांवर आळा घालत नाही. आणि समाजात चुकिचा इतिहास पसरू नये, राष्ट्र व राष्ट्राच्या प्रतिकांचा अवमान होऊन नये म्हणून संविधानीक मार्गाने विकृतींना थांबण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा सर्व सामान्य लोकांवर गुन्हे दाखल केले जातात. आणि विकृतींना मोकाट फिरू दिले जाते यालाच निरपेक्ष व पारदर्शक सरकार म्हणायचे का? मनोहर कुलकर्णी नावाचा वयोवृध्द विकृत मनोरुग्ण, देशाचे स्वातंत्र्य, देशाचा ध्वज, राष्ट्रगीत मान्य करत नाही अशा व्यक्तीचे नागरिकत्व रद्द करून तुरुंगात डांबुन ठेवायला पाहिजे तर देश विरोधी वक्तव्य करणाऱ्या विकृतींना सरकार संरक्षण देते. कशामुळे तर तो केवळ हिंदुत्ववादी पुरस्कार करतो म्हणून. मनोहर कुलकर्णी च्या जागेवर जर एखादा मुस्लिम असता तर सरकार, गृहमंत्री व भक्त खरचं एवढे शांत बसले असते का? मनोहर कुलकर्णी गांधीच्या वडीलांवर वादग्रस्त वक्तव्य करून त्यांना चोर म्हणतो, देशाच्या माजी प्रधानमंत्र्यांना तो अकार्यक्षम म्हणतो, गृहमंत्र्यांना या बाबीब त्यांच्या विभागाकडून कोणतीही माहिती नसेल मिळाली पण सर्वसामान्य लोक एवढ्याप्रमाणात निवेदने देऊन त्या विकृत मनोरुग्णाला अटक करावी याची मागणी करतात पण सरकार काहीच गांभीर्याने घेत नाही. सरकार गांभीर्याने घेत नाही म्हणून जनता सोशल मिडीयावर व्यक्त होते. मात्र अशा बाबतीत व्यक्त होताना कोणाच्याही वैयक्तिक भावना व धर्म द्वेष होईल अस वक्तव्य व लिखाण करू नका असे आदेश दिले जातात. परंतु लोकांना धर्म जात व्यक्ती यावर वैयक्तिक मत मांडण्याची परिस्थिती च सरकारने निर्माण होऊ देऊ नये. यासाठी मात्र सरकार काहीच करत नाही. मनोरुग्ण कुलकर्णी यांचा आणि जनतेचा वैयक्तिक असे वाद कोणतेच नाहीत परंतु तो चुकिचे विचार सांगून राष्ट्र व राष्ट्रीय सन्मानाच्या विरोधात वागत असताना लाखों लोकांना आदेश दिल्यापेक्षा एका मनोरुग्णाला अटक केली तर लोकांना मत व्यक्त करण्याची गरजच नाही. परंतु मनोरुग्णाला अटक न करता सर्वसामान्य लोकांवर गुन्हे दाखल केले जातात तर धर्मवाद, जातीवाद व विषमता पसरवणारे कृत्य नाही का? आमचे गृहमंत्री स्वराजाचे शत्रु औरंजेब यांना औरंग्या म्हणतात. शत्रुचाही सन्मान करावे ही आमच्या शिवबाची शिकवण असताना त्याच शिवबाचे नाव घेऊन औरंजेबाला ते औरंग्या म्हणतात. कारण काय तर ते स्वराज्याचे शत्रु होते. आता मुळ प्रश्न हा आहे. कि स्वराज्याचा आज शत्रु कोणाला म्हणायचे? जे विदेशी आहेत त्यांना? जे मुस्लिम आहेत त्यांना? कि जे देशात राहुन देश विरोधी कृत्य करत करतात त्यांना? देशात राहुन देशाची घटना, राष्ट्र, राष्ट्रीय प्रतिके, राष्ट्रगीत, व महापुरुषांचा अवमान करणारा खरा शत्रु होय. मग औरगंजेबाला ज्या तिव्रतेने गृहमंत्री साहेबांनी औरंग्या म्हणले होते त्याच तिव्रतेने ते मनोहर कुलकर्णी यांना ते मन्या म्हणतील का? कारण मनोहर कुलकर्णी देखील आज राष्ट्रद्रोह करत आहे. औरंगजेब हा शत्रु होता म्हणून विरोध आहे की मुस्लिम होता म्हणून विरोध आहे. शत्रु होता म्हणून विरोध असेल तर फडणवीस साहेबांनी मनोहर कुलकर्णी यांनाही विरोध करावा, आणि जर मुस्लिम होता म्हणून औरंगजेब ला विरोध होत असेल तर फडणवीस साहेब धार्मिक द्वेष पसरवतात म्हणून गुन्हा दाखल का होऊ नये? सत्य बोलले तर धर्म, जात व्यक्ती यांची बदनामी होते अस गृहमंत्री यांच्या बोलण्याचा अर्थ निघतो परंतु गृहमंत्री यांचे कृत्य निरपेक्ष आहे का हा सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे. तिकडे तो दुसरा मनोविकृत मनोरुग्ण शरद पोक्षे म्हणतो आरक्षण आणि कोणतीही सवलत नसताना माझी मुलगी वैमानिक झाली. मुलगी वैमानिक झाली या मागे सावित्रीमाई फुले व भारतीय संविधान खंबीरपणे उभे आहे. आणि मुलगी वैमानिक झाली हे याचा अभिमान सर्वांना आहे. परंतु शरद पोक्षे आरक्षणा बद्दल चुकिचे विधान करतो आणि सरकार त्यावर कोणतीही कारवाई करत नाही. मग वैचारिक पद्धतीने जर पोक्षेला उत्तर दिले तर जातीवाद होतो. हजारो वर्षांपासून शिक्षणावर एकाधिकार हा ब्राम्हणांचा होता. म्हणून ब्राह्मण न्याय व नितीवान आणि समतावादी नसल्याने त्यांनी त्यांच्या घरातील महिलांना सुद्धां शिक्षणाचा गंधही लागु दिला नाही अथवा कोणत्याही ब्राम्हणाने महिलांच्या शिक्षणाचा पुरस्कार केला नाही. इंग्रज भारतात आले त्यांनी शिक्षणाची सुरवात केली, सावित्रीमाई व जोतीबा यांनी जेव्हा मुलींना शिक्षण सुरू केले तेव्हा विरोध करणारे ब्राम्हणच होते. मुलीला शिकवले तर धर्म बुडतो असे सांगुन महिलांचे शिक्षण नाकारणारे ब्राम्हण आणि विरोधाला न जुमानता महिलांना शिक्षण देणारे सावित्रीमाई व जोतिबा फुले यामध्ये फुले दांपत्य. याच दांपत्यामुळे महिलांना शिक्षणाची संधी निर्माण झाली. पुढे बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय घटनेमध्ये लिंगभेदाचा विरोध न करता प्रत्येकाला शिक्षणाचा अधिकार मिळवून देऊन त्या अधिकाराचे संरक्षण केले. परंतु एवढा इतिहास कळेल एवढा विद्वान शरद पोक्षे नाही. आणि आरक्षण म्हणजे सवलत नाही नाही तर संधी आहे. ब्राम्हणांनी हजारो वर्षांपासून माणसाला माणसाजवळ येऊ दिले नाही, शिक्षण, उद्योग यापासून कोसो दुर ठेवले, ते सर्व संविधानाने हानुन पाडून सर्वांना समान केले. ब्राह्मण जातीवाद करतात आणि ते इतरांना आपल्या बरोबरीने येऊ देत नाही. म्हणून त्यांच्या बरोबरीने जाण्यासाठी आरक्षण आहे. आजही ब्राम्हणाकडे न्याय व समता नाही. जर तसे असते तर मंदिरात आरक्षण नाही तर ब्राम्हणेत्तर लोक पुजारी सोडा गाभाऱ्यात जाऊ शकत नाहीत. ब्राम्हणेत्तर लोक सोडा ब्राम्हणांच्या महिला पुजारी होऊ शकत नाहीत कारण त्यांचा धर्म त्यांना होऊ देत नाही. परंतु ब्राम्हण असो वा आदिवासी प्रत्येकाला कोणत्याही शासकीय व सार्वजनिक पदावर जावे लागते ही देण फक्त भारतीय संविधानाची आहे. आणि महिला शिक्षण घेतात या मागे सावित्रीमाईचा त्याग आहे हे पोक्षे जाणीव पुर्वक बोलत नाहीत कारण डोक्यात व कृतीत केवळ विषमता आणि द्वेष आहे. पोक्षे कडे थोडासा जरी प्रामाणिक पणा असता तर त्याने सांगितले असते आमच्या कडे हजारो वर्षांपासून शिक्षण होते पण आम्ही महीलांना शिकवू शकलो नाही. आजही आमच्या ताब्यात मंदीरे आहेत पण महिलांना पुजारी बनवू शकलो नाही फक्त सावित्रीमाईच्या त्यागाचे व बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने माझी मुलगी वैमानिक बनली. कारण सत्य बोलायला नितीमत्ता लागते आणि तिच नितीमत्ता पोक्षे, मनोहर कुलकर्णी अशा लोकांकडे नाही. परंतु अशा मनोरुग्ण लोकांना पाठीशी घालून, त्यांना संरक्षण देऊन आणि त्यांच्या विरोधात पण सत्य बोलणाऱ्या वर गुन्हे दाखल केले जात असतील तर याचा सरळ सरळ अर्थ आहे वाचाळविरांना व मनोरुग्णाना सरकारच पाठीशी घालून समाजात शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून लोकांचे लक्ष मुळ समस्येपासून दुर करण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु घोटाळेबाज लोकांच्या हाती अर्थखाते, पैशाचा जोरावर आमदार ची बोली, महागाई, बेरोजगारी, आरोग्य सुविधा, निकृष्ट दर्जाचे काम व करोडोचे घोटाळे, जळते मनीपुर, नग्न महिलांची धिंड अशा अनेक समस्या सर्वसामान्य जनता कधीच विसरु शकत नाही. सरकारने कितीही वाचाळविर व मनोरुग्णाच्या माध्यमातून सामाजिक शांतता व सुव्यवस्थेचा निर्माण होण्यासाठी प्रयत्न केला तरीही आता लोक जागृत झाले आहेत. आणि वाचाळविरांचा व मनोरुग्णाचा सरदार कोण हे याची ओळख जनतेला झाली आहे. परंतु सरकार ने केलेल्या विषमता, धर्मद्वेष, व्यक्तीद्वेष, व पक्षपाती पणाचे कृत्य हे देखील शिक्षेस पात्र आहे. हाती सत्ता आहे म्हणून सत्तेचा गैरवापर करू नये हे नितीमत्येचे लक्षण आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**



**पान १ वरुन**

### पायाभूत सुविधाच नव्हे तर ..

वळविणे तसेच पूर्व आणि पश्चिम विदर्भातील नदी जोड प्रकल्पातून तेथील जिल्ह्यांमधील दुष्काळ संपविणे याला प्राधान्य असल्याचे सांगितले. प्रारंभी बैठकीत महाराष्ट्राच्या वतीने नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरव विजय आणि सचिव शैला ए यांनी सादरीकरण केले. जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यात अनेक प्रकल्प यापूर्वी पूर्ण झाले असून काही प्रकल्प सुरू आहेत तर काही

प्रकल्पांवर कार्यवाही सुरू आहे. विशेषतः जलस्वराज्य प्रकल्प टप्पा एक, टप्पा दोन, विविध जलसंपदा प्रकल्पांमधील सुधारणा, महाराष्ट्र जल क्षेत्रातील सुधारणा प्रकल्प, कृषी विषयक स्पर्धात्मक प्रकल्प यापूर्वी पूर्ण झाले असून सध्या कृषी आणि ग्राम विकासाचा स्मार्ट प्रकल्प जलसंपदा प्रकल्पांच्या सुरक्षा, सुधारणा, कार्यक्षमता आणि देखभालीचा प्रकल्प तसेच पोकरा सारखे प्रकल्प सुरू आहेत. कौशल्य विकासाचा दक्ष प्रकल्प, पर्यावरण विषयक एमआरडीपी अशा प्रकल्पांवर कार्यवाही सुरू आहे अशी माहिती देण्यात आली.

**जागतिक बँकेकडून अपेक्षा** याशिवाय नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई महानगरातील वाहतुकीमधील सुधारणा प्रकल्प, हरित ऊर्जा, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये आर्थिक विकास आणि नागरिकांना जलद सेवा देणे यासारख्या प्रकल्पांबाबतीत जागतिक बँकेकडून सहकार्य अपेक्षित आहे यावर या सादरीकरणामध्ये भर देण्यात आला. यावेळी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालकांनी विविध मुद्द्यांवर चर्चाही केली

### शेतमालाला हमीभाव मिळण्यासाठी ..

मोर्चाच्या वतीने सांगण्यात आले.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन पर ५० हजार रुपये अनुदानाची रक्कम वितरित करण्यासाठी सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पुरवणी मागण्यांमध्ये आर्थिक तरतूद करण्यात आलेली असून लवकरच हे अनुदान वितरित करण्यात येईल. ऊर्जा, महसूल, पशु संवर्धन, सामाजिक न्याय आदी विभागांशी निगडित मागण्यांच्या संदर्भात संबंधित विभागांशी लवकरच स्वतंत्र बैठका घेऊन त्या मागण्यांवरही सकारात्मक निर्णय घेतले जातील. ऊसतोड कामगारांबरोबरच वाहतूकदार यांचा लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामध्ये समावेश करणे, तसेच त्यांच्या विविध मागण्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करणे या संदर्भात विशेष सहाय्य विभागाशी पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठक घेऊन तेही निर्णय घेतले जातील, अशीही माहिती मंत्री श्री. मुंडे यांनी दिली.या बैठकीस कृषी विभागाचे प्रधान सचिव परिमल सिंह, उपसचिव संतोष कराड तसेच संघटनेचे राजू पाटील , संदीप गिड्डे पाटील यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

हे आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याचे संघटनेच्या वतीने संदीप गिड्डे पाटील यांनी जाहीर केले तसेच सरकारने दाखवलेल्या सकारात्मक भूमिकेबद्दल आभार व्यक्त केले.

### देशात तीन वर्षांत १३ ..

मुली तीन वर्षांत बेपत्ता झाल्या, तर छत्तीसगडमध्ये त्यांची संख्या ४९,११६ महिला व १०,८१७ मुली अशी होती, असे संसदेला सादर करण्यात आलेल्या आकडेवारीत म्हटले आहे. केंद्रशासित प्रदेशांपैकी दिल्लीत बेपत्ता मुली व महिलांची सर्वाधिक संख्या नोंदवली गेली. राष्ट्रीय राजधानीत २०१९ ते २०२१ या कालावधीत ६१,०५४ महिला व २२,९१९ मुली बेपत्ता झाल्या. देशभरातील महिलांच्या सुरक्षिततेसाठी आपण अनेक उपाययोजना केल्या असल्याचीही माहिती सरकारने संसदेला दिली. यात लैंगिक अत्याचारांना प्रभावी आळा घालण्यासाठी गुन्हेगारी कायदा (सुधारणा) कायदा २०१३ अंमलात आणण्याचा समावेश असल्याचे सरकारने सांगितले.

## वंचितांच्या 'शासन आपल्या दारी' अभियानाला नागपूरात उत्स्फूर्त प्रतिसाद

नागपूर : सामाजिक न्याय विभागाच्या पुढाकारात महाराष्ट्रामध्ये प्रथमच केवळ अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय घटकाच्या शेकडो लाभार्थ्यांना 'शासन आपल्या दारी' अभियानाअंतर्गत लाभ देण्याच्या कार्यक्रमाला नागपुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शासनाच्या विविध योजनांचा लाभ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आला.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत 'शासन आपल्या दारी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थितांना संबोधित केले. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ता कोकड्डे, खासदार कृपाल तुमाने, आमदार सर्वश्री सुनिल केदार, प्रविण दटके, कृष्णा खोपडे, आशिष जायस्वाल, जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड व उपायुक्त सुकेशीनी तेलगोटे, समाजकल्याण अधिकारी किशोर भोयर, यांच्यासह विभागातील अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'शासन आपल्या दारी' अभियानांतर्गत सर्व विभागाच्या योजनांचे लाभार्थ्यांना थेट वाटप केले जाते. राज्यातील लक्षावधी लाभार्थ्यांना त्यांचा लाभ शासन स्वतःहून देत आहे. नागपूरमध्ये सामाजिक न्याय विभागाने वेगळ्या प्रयोग करत या विभागांतर्गत असणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, धनगर घटकांच्या अनेक योजनांच्या माध्यमातून शेकडो लाभार्थ्यांना हा लाभ आज प्रत्यक्ष दिला. या आयोजनाचे कौतुक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी केले. यावेळी दूरदृष्य प्रणालीव्दारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केले.

'शासन आपल्या दारी' उपक्रमातून राज्यातील वंचित घटकांना शासकीय योजनांचा लाभ देऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आतापर्यंत एक कोटी १० लाख पेक्षा जास्त लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असून यापुढेही विविध विभागाच्या योजना नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचविण्याचे काम अविरत सुरू राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.राज्यात नवीन शासन आल्यापासून शासन आपल्या दारी हा उपक्रम सुरू करण्यात आला असून या माध्यमातून नागरिकांना सरकारी कार्यालयात हेलपाटे घालण्याऐवजी शासनाचे वेगवेगळे विभाग लोकांपर्यंत योजना घेवून जात आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. मात्र आता एकेका जिल्ह्यात ४ ते ५ लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने शासन आपल्या दारी उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

पुढील तीन वर्षात राज्याला बेघरमुक्त करण्याचा संकल्प असल्याचे सांगतांना अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ५ लाख घरकुले, मोदी आवास योजनेंतर्गत इतर मागासवर्गीयांसाठी ३ लाख घरे तसेच विमुक्त व भटक्या जमाती व इतरासाठी २ लाख घरकुलांचे नियोजन केले असल्याचे ते म्हणाले. तसेच सफाई कामगारांना जीव धोक्यात घालून सिव्हरेजमध्ये उतरण्याची गरज पडणार नाही अशा प्रकारची सुविधा निर्माण करण्यात येइल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितलेशासन आपल्या दारी योजनेतून सर्वच योजनांचे लाभ दिले जात आहे. मात्र नागपूर येथील सामाजिक न्याय विभागाने मोठ्या संख्येने एकाच विभागाच्या लाभार्थींना लाभ देण्यासाठी केलेल्या आयोजनबद्दल श्री.फडणवीस यांनी सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी नवीन कल्पना व नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून वंचितांच्या जीवनात विकासाचा नवीन मार्ग दाखवण्यासाठी त्यांना तंत्रशिक्षणासोबतच व्यावसायिक प्रशिक्षण देवून आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न 'शासन आपल्या दारी' उपक्रमातून महाराष्ट्र शासन करत असल्याचे सांगितले.याप्रसंगी श्री. गडकरी यांच्या हस्ते सावनेर येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहाच्या नवनिर्मित इमारतीचे दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण करण्यात आले. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या जिल्ह्यातील २६ वसतिगृह व निवासी शाळेतील कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संविधान प्रास्ताविकेचे वाचन तसेच आभार प्रदर्शन सहाय्यक आयुक्त सुकेशीनी तेलगोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात दत्तयाग संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात श्रावण अधिक मास निमीत्त आयोजीत ३ दिवसीय दत्तयाग दिनांक २५ जुलै ते दिनांक २७ जुलै अखेर मोठ्या भक्तीभावाने संपन्न झाला. इंगळे कुटुंबीयांच्या तिसऱ्या पिढीचे मानकरी स्वामी सेवक व मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, रूपाली इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत चोळप्पा महाराजांचे वंशज प.पू.मोहनराव पुजारी यांच्या अधिपत्त्याखाली व प.पू.मंदार महाराज पुजारी व मुग्धा पुजारी, मोहित महाराज पुजारी यांच्या हस्ते बदलापूरचे प्रसाद गुरुजी व ब्रह्मवृंदांच्या मंत्रोच्चारात हा दत्तयाग संपन्न झाला. दिनांक २५ जुलै रोजी सकाळी ७ : ३० ते ८:३० या वेळेत गणपती कुलेष्ट देवता, वास्तू देवता, ग्रामदेवता आवाहन, सकाळी ८ : ३० ते ९ : ३० या वेळेत आचमन, प्राणायाम, मंगलाचरण, देवता गुरुवंदन शांतीपाठ, प्रायश्चित संकल्प, गोमाता पूजन, विष्णुपूजन, पंचगव्य प्राशन, यज्ञोपवित धारण, यथाशक्ती गोदान संकल्प, याग संकल्प, सकाळी ९ : ३० ते ११ या वेळेत गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, वसोर्धरा पूजन, नांदीश्राद्ध, सकाळी ११ ते ११ : ३० या वेळेत आचार्यादी, ऋत्वीज्वरण, ब्राह्मण पूजन, दिग्रक्षण, मंडप शुद्धी, कुंड पूजन, सकाळी ११ : ३० ते २ : ३० या वेळेत अग्निमंथन, अग्नी स्थापना, वास्तू योगिनी, क्षेत्रपाल, दत्तभद्र, मंडल देवता स्थापन, देवता अभिषेक पूजन, दुपारी ४ ते ६ : ३० या वेळेत



नवग्रहमंडल स्थापन, रुद्रकलश स्थापन, नवग्रह होम, सायंपूजन आरती,

दिनांक दि.२६ जुलै रोजी सकाळी ८ ते ११ : ३० या वेळेत मंगलाचरण, शांतीपाठ, पीठमंडल, देवता प्रात पूजन, दत्तात्रेय स्वामी आवाहित देवता अभिषेक पूजन, पुजन अर्चन, ब्राम्हण पुजन, दुपारी ३ : ३० ते ६ : ३० या वेळेत नवग्रह हवन, प्रदान दत्तमाला मंत्र हवन, सायं पूजन, आरती, दिनांक २७ जुलै रोजी सकाळी ७ : ३० ते दुपारी १ : ३० या वेळेत मंगलाचरण, शांतीपाठ, पीठमंडल, देवता प्रातः पूजन, दत्तात्रय स्वामी आवाहित देवता अभिषेक पूजन अर्चन, स्थापित देवता होम, उत्तरांग पूजन, दुपारी १२ : ३२ ते १२ : ५७ या वेळेत अभिजीत मुहूर्त, लाभ योग, आरती आशीर्वाद, ब्राह्मण पूजन, कर्म समापन, पूर्णाहुती इत्यादी विधी संपन्न होऊन हा दत्त याग सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी बोलताना मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी यंदा समाधानकारक पाऊस व्हावे यासाठी हा दत्तयाग सोहळा आयोजित करून संपन्न झालेला आहे.वटवृक्ष मंदिरात संपन्न झालेल्या या दत्तयाग प्रसंगी वटवृक्ष मंदिर गाभारा परिसरास आकर्षक फुलांच्या सजावटीत सनईच्या मंजूळ स्वर आविष्काराने अत्यंत मंगलमय प्रसन्नपूर्वक भक्तिमय वातावरणातील हा सोहळा उपस्थित भाविक याची देही याची डोळा अनुभवून धन्य झाले असल्याचे मनोगत व्यक्त केले. हा दत्तयाग सोहळा परिपूर्ण होणेकामी मुंबईचे स्वामीभक्त राजू गवाणकर, साईप्रसाद सांमत, प्रफुल्ल सावंत, नाना वेदक, पेंडुरकर काका, निलेश कुळकर्णी, अजीत तासगावकर आदींनी परिश्रम घेतले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, श्रीशैल गवंडी, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, ऋषिकेश लोणारी आदीसह भावीक भक्त उपस्थित होते.

# वेळापूर पोलिसांनी खंडणी मागितल्या प्रकरणी एकाला केली अटक..

## न्यायालयाने आरोपीला दिली ३१ जुलै पर्यंत पोलीस कोठडी

वेळापूर/प्रतिनिधीः वेळापूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजे तोंडले येथील अजित विलास कोडक यास ५० हजार रुपये खंडणी मागितल्या प्रकरणी वेळापूर पोलिसांनी अटक करून गुन्हा दाखल केला आहे. सदर आरोपीस मा. कोर्टापुढे हजर केल्यानंतर ३१ जुलै पर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. वेळापूर परिसरात कुठेच केबल नेटवर्क खराब होत



नाही परंतु तोंडले येथे वारंवार नेटवर्क खराब असल्याची तक्रारी येत होत्या परंतु ही केबल खराब न होता कोणीतरी अज्ञात व्यक्ती ही केबल खराब करत होती त्यामुळे मोबाईल कंपन्यांचे वारंवार नेटवर्क जात होते. सदर दिलेल्या तक्रारीमुळे ही घटना उघडकीस आली असल्याचे वेळापूर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव यांनी सांगितले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, रमेश मुन्सीलाल श्रीवास्तव वय ५७ वर्षे रा. इन्दौर राज्य, मध्यप्रदेश सध्या भाईनाथ नगर वेळापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वेळापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून सध्या एअरटेल कंपनीत नेटवर्क इंजिनियर म्हणून काम करत असून माझेकडे एअरटेल कंपनीचे माळशिरस ते कासेगाव ता. पंढरपूर पर्यंत मोबाइल टॉवरचे नेटवर्कचे काम आहे. माझेसोबत लक्ष्मण केदार (इंजिनियर), राहुल भाकरे असे दोघेजण काम करतात दिनांक २६ जुलै २०२३ रोजी मौजे वेळापूर ते पंढरपूर रोडवरील एअरटेल कंपनीचे केबल खराब झाली

याबाबत कंपनीचे अधिकारी यांनी दुपारी १२ वा.सुमारास मोबाइल व्हॉट्सपच्या मेसेजव्दारे माहिती दिल्यानंतर तात्काळ तेथे मी व माझे सहकारी केदार (इंजिनियर), राहुल भाकरे, चालक सचिन राऊत असे मिळून चारचाकी वाहनाने वेळापूर येथून निघुन रस्त्याच्या बाजूने कंपनीचे केबल पाहत पाहत तोंडले येथे शिवनेरी हॉटेल जवळ आलो असता रोडचे बाजूस एक तरुण एअरटेल कंपनीचे केबल वायर जमीनीवर पाचट टाकून जाळत असल्याचे दुपारी २ वाजण्याच्या सुमारास दिसले त्यावेळी आम्ही गाडी रोडचे बाजूस थांबवून खाली उतरून सदर व्यक्तीकडे जाऊन आमचे कंपनीचे केबल का जाळत आहे. त्यामुळे एअरटेल या कंपनीचे नेटवर्क खराब झाले आहे म्हणाले असता त्यांनी आम्हास मी अजित विलास कोंडग रा. तोंडले असे सांगून मी कंपनीचे केबल जाळून टाकतो, तुम्ही विनापरवाना कंपनीचे केबल टाकले आहे आमचे गावाचे हद्दीतून तुमचे कंपनीचे केबल जाते तुम्हाला जर कंपनीचे काम करायचे असेल तर मला आताचे आता ५०,०००/- रूपये खंडणी दया नाहीतर मी केबल जोडू देणार नाही असे म्हणून त्यांनी दगड उचलून आम्हास जर तुम्ही केबल जोडली तर तुम्हाला सगळ्याला दगड डोक्यात घालून एक एकाला जिव मारून टाकीन अशी धमकी दिली त्यावेळी आम्ही घाबरलो. मी घाबरून अजित कोंडग यास हात जोडून आमचेकडे आता पैसे नाहीत आमचे साहेबांना विचारून पैसे देतो असे म्हणालो असता अजित कोंडग यांनी मला गालावर दोन चापटा मारून मला खंडणी देवूनच केबल जोड नाहीतर तुम्ही केबल जोडली तर, एक एकाला जिवंत ठेवणार नाही, तुम्ही आमचे गावातून कसे जाता व कसे केबल जोडता ते बघतो अशी धमकी दिल्याने आम्ही सर्वजण घाबरलो. त्यानंतर अजित कोडग हा त्याचे मोटार सायकल नंबर एम एच ४५ यु १३६८ वरून निघून गेला. या घडलेल्या प्रकाराबाबत आमचे वरिष्ठ अधिकारी यांना कळवून आम्ही सर्वजण मिळून वेळापूर पोलिसात गुन्हा दाखल केला. दरम्यान अजित कोंडग हा देखील आमचे पाठीमागे पोलीस ठाणे येथे येऊन पोलिसांच्या समोर आरोपी असा म्हणाला की तुम्ही माझेवर पोलीसांत केस केली तर माइया अंगावर पेट्रोल ओतून पेटवून घेईन अशी धमकी दिली व त्याने खिशात हात घातला असता पोलीसांनी आरोपीस तात्काळ ताब्यात घेतले.सदर घटनेचा अधिक तपास वेळापूर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक निलेश बागाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अल्ताफ काझी हे करत आहेत.

# प्राथमिक शाळां प्रमाणे सर्व शाळा शासकीय शाळा करण्याचा आमचा मानस मात्र संस्था चालकांचे अधिकार त्यांना देणारच : शालेय शिक्षण मंत्री ना.दीपक केसरकर



निफाड/प्रतिनिधीः नुकतीच महाराष्ट्र राज्य माध्य मिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ नाशिक, येथे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्ष ते खाली शिक्षण संस्था चालक महामंडळ नाशिक, नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघ , व सर्व संघटनांचे प्रतिनिधी यांच्या सोबत शाळांचे, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे प्रश्न समजावुन घेणे व ते तातडीने सोडवणे या साठी विभागीय मंडळाचे अध्यक्ष मा . नितीन उपासनी. उपसंचालक मा. बी . बी . चव्हान, सचिव मच्छिन्द्र कदम , उपरीक्षणधिकारी उदय देवरे , प्रकाश आहिरे .सुधिर पगार यांच्या उपस्थितीत पार पडली या वेळी शिक्षण संस्था महामंडळाच्या वतीने मा .मंत्री विजय नवल पाटील , नितीन ठाकरे, पंढरीनाथ थोरे संदीप गुळवे यांनी शिक्षक भरती, वेतनेत्तर अनुदान , पवित्र पोर्टल , शिक्षकेत्तर भरती, आर .टी . ई प्रवेश या समस्या मांडल्या तर मुख्याध्यापक संघाच्या वतीने सचिव एस. बी . देशमुख, एस .के सावंत, डॉ. संजय शिंदे,के .के . आहिरे , साहेबराव कुटे, भरत भामरे, डॉ. अनिल माळी ,संजय देसले यांनी प्रश्न मांडले . १३३ कोटीची फरक बीले, सेवानिवृत्त मुख्याध्यापक – शिक्षक रजा रोखीकरणाची बीले , संच मान्यता, नाशिक जिल्ह्यात १००० शिक्षक व ४ शिक्षकेत्तर पदे रिक्त, आदर्श शिक्षक पुरस्कार , विद्यार्थी गुणवत्तेवर चर्चा ,जुनी पेन्शन योजना, पुर्णवेळ ग्रंथपाल व लॅब असिस्टंट पदे इत्यादी विषय मांडले यावर उत्तर देताना मा . दीपक केसरकर यांनी उत्तर दिले सर्व अनुदानित शाळा शासकीय करून जिल्हा परिषदेच्या शाळा प्रमाणे विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य व अनुदान देणार आहोत मात्र संस्थेचे अधिकार अबाधीत ठेवणार आहोत, भरती पवित्र पोर्टल नुसारच होणार पण संस्थेला चॉईस देणार १० /१ त्या साठी सर्वांनी रोस्टर तपासणी करावी . भरती प्रक्रिया पुढील आठवड्यात सुरु करणार, खाली प्राथ.के .जी साठीही काही शिक्षक घेणार , वेतनेत्तर अनुदानात वाढ करणार . स्काऊट गाईडला बळकटी देणार मुलांच्या मनात हा संस्कार रुजावा, नविन शैक्षणिक धोरणाची केन्द्राप्रमाणे अंमल बजावणी करणार . पारंपारिक शिक्षणापेक्षा व्यावसायीक व आवडी नुसार शिक्षणाची सुविधा देणार .या साठी आर्थिक तरतुद म्हणुन अर्थ खात्याची परवानगी घ्यावी लागते . कोणताही शिक्षक तासिका बेसिक , पार्ट टाइम आपणास ठेवायचा नाही . सर्व शाळांना सोलर सिस्टिम बसवणार त्यासाठी अनुदानही देवु या घोषणा केल्या

या वेळी कोंडाजी मामा आव्हाड, आण्णा पाटील , बी . डी गांगुर्डे .एस. ए . पाटील , राजेन्द्र निकम, संग्राम महाराष्ट्र करंजकर ,संजय चव्हान, बी .के . नागरे, आर .टी . जाधव, भागीनाथ घोटेकर, टी एम डोंगरे, आरुण पवार , मोहन चकोर, टी एम घोडके, मनोज वाकचरे ,बाळा साहेब ढोबळे, शिरसाट उपस्थित होते .

# पोलादपूर– महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्ता सर्व वाहतुकीस पुढील १५ दिवस बंद

सातारा : पोलादपूर महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्ता हा सद्य:स्थितीत सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वाहतुकीकरीता पुढील १५ दिवस पुर्ण बंद करण्याबाबत जिल्हादंडाधिकारी रायगड – अलिबाग यांनी निर्देश दिले आहेत. पोलादपूर महाबळेश्वर (आंबेनळी घाट) रस्ता सर्व प्रकारच्या वाहतूकीकरीता पुढील १५ दिवसांकरीता बंद करण्यात आलेला आहे. याप्रकरणी पाऊस, भुस्खलन, दरड कोसळणे इत्यादी परिस्थितीबाबत वाहतुकीचा दर १५ दिवसांनी सविस्तर आढावा घेऊन हा घाट रस्ता बंद ठेवण्याच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अहवाल दर १५ दिवसांनी पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड अलिबाग व उपविभागीय अधिकारी महाड यांनी सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी रायगड– अलिबाग संदेश शिर्के यांनी कळविले आहे.

# स्वेरीच्या पाच विद्यार्थ्यांची ‘जबील’ या कंपनीत निवड

पंढरपूर/प्रतिनिधीः ‘जबील’ या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्ह्यूद्वारे निवड करण्यात आली आहे.’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली. इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राशी संबंधीत असलेल्या पुणे येथील ‘जबील’ या कंपनीच्या निवड समितीने अंतिम फेरीतून इंजिनिअरिंगच्या सुमेध संजयकुमार गायकवाड, गणेश दादाराव कवडे, श्रेया दीपक कुलकर्णी, ओंकार अंकुश झिंगाडे व ऐश्वर्या आप्पा देवकुळे या पाच विद्यार्थ्यांची निवड केली. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध होत आहेत




आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्स टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्यूव, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनींग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लैंग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी– ‘जबील’ या कंपनीमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या पाचही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.


# अक्कलकोट येथे शिंगवी ज्वेलर्सच्यावतीने सुवर्ण प्रदर्शन

अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर येथील व्हीआयपी रोड येथील शिंगवी ज्वेलर्सच्या वतीने सुवर्ण व हिरे प्रदर्शनास सुरुवात मोठ्या उत्साहात झाली. श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलन करून प्रदर्शनास चालना देण्यात आले.सदर प्रदर्शन फत्तेसिंह क्रिडांगणा समोरील हॉटेल फोर पेटेल्स येथे आयोजित करण्यात आले आहे.




यावेळी शितलताई म्हेत्रे, डॉ. सुवर्णा मलगोंडा,अलकाताई भोसले,अर्पिताताई भोसले,रुपाली इंगळे, आरती काळे,अनिताताई खोबरे,सोनल जाजू, नीता मसुती, उषा छत्रे, दीपमाला आडवीतोटे, डॉ मंजुषा मेंथे, अश्विनी बोराळकर, रूपाबाई कणमुसे, सविता मुस्के, राजश्री चौधरी,रुपाली शहा, संध्या हिप्परगी अप्पासाहेब पाटील,अंकुश चौगुले, एजाज मुतवल्ली यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.सोलापूरसारखे सुवर्ण दालनांची माहिती अक्कलकोट सारख्या ग्रामीण भागात व्हावी आणि सुवर्ण व हिरे यांचे आगळेवेगळे अलंकार सर्वांना घेता यावेत हा उद्देश समोर ठेऊन सदर प्रदर्शन दि.३० व ३१ जुलै असे दोन दिवस सकाळी अकरा ते रात्री साडे आठ या वेळेत ठेवण्यात आले आहे.प्रारंभी शिंगवी परिवाराच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.यावेळी मांडलेल्या प्रदर्शनात सोने व हिरे यांचे असंख्य नमुन्याचे विविध अलंकार मांडण्यात आले आहेत. त्याला पहिल्या दिवशी अक्कलकोटकरांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे पाहावायस मिळाले.शिंगवी परिवाराच्या वतीने प्रदीप शिंगवी, अक्षय शिंगवी व सफल शिंगवी व कर्मचारी यांची उपस्थिती होती

# शब्दकोडे क्र ७५



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा ‘जुम्मा चुम्मा’या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा ‘आती क्या खंडाला’ गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

